# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८२** **दिनांक ०७/०७/२०२१**

## घरफोडी करणा-या आरोपींना गुजरात मधून अटक करुन ८,७६,५१७/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेस यश.

दिनांक १८.६.२०२१ रोजी सायं. ०५:०० वा. ते दि. १.७.२०२१ रोजीच्या १०:१५ वाजताच्या दरम्यान फिर्यादी श्री. प्रविणकुमार माली यांच्या गाळा नंबर ३४७९/१२, सर्वे नंबर १६६, नारायण डेव्हलपर्स, वसई फाटा, नालासोपारा पुर्व येथील कंपनीचा मागील शटरचा टाळा कुणीतरी अज्ञात चोरटयाने कुठल्यातरी टणक हत्याराने तोडुन त्यावाटे कंपनीत प्रवेश करुन स्टेनलेस स्टिलची साखळी व वाटी असा तयार करुन डिलेवरीकरीता पँकिंग करुन ठेवलेला माल फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीचे ईरादयाने घरफोडी चोरी झालेबाबत, फिर्यादी यंनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुरनं । ६१९/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ४११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे घटनास्थळाची पाहणी करून, तांत्रिक गोष्टींचा वापर व गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर गुन्हयाचा तपास करुन सदर गुन्हयातील दोन आरोपीत तसेच गुन्हयातील चोरीस गेलेला माल घेणारा आरोपीत अशांना अहमदाबाद, गुजरात राज्य येथुन आरोपीत नामे. १) नयनाराम अमृतलाल पुरोहित वय : २६ वर्षे रा. ठि. ओढव, जि.अहमदाबाद राज्य : गुजरात २) रमेश करसन भिल वय : २७ वर्षे ३) अनदाराम उर्फ अनिद नाराणाराम रबारी वय : २५ वर्षे दोन्ही राहणार :खैरपाडा, वालीव, वसई पुर्व यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच गुन्हयात वापरण्यात आलेल्या वाहनाचा चालक आरोपीत क्रमांक ४) नयीम अस्लम खान, वय - २६ वर्षे, रा. संतोषभुवन, नालासोपारा पुर्व यास देखिल वसई येथुन ताब्यात घेण्यात आले असुन सदर आरोपीत यांना अटक करुन गुन्हयातील एकुण ८,७६,५१७/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. अमोल मांडवे मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोनि. श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. ज्ञानेश फडतरे, पोहवा. मुकेश पवार, मनोज मोरे, योगेश देशमुख, पो.ना. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, अनिल सोनवणे, राजेन्द्र फड, सतिष गांगुर्डे पो.अंम. विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बलीद , गजानन गरीबे, यांनी केलेली आहे.

-----ooooo------